### ई – बस प्रवाशांसाठी त्रैमासिक पास योजना

**अकोला:** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने प्रवाशांच्या सोयीसाठी आणि ई- बस सेवेला अधिक प्रतिसाद मिळवण्यासाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. आता राज्यातील ई-बस प्रवाशांना मासिक त्रैमासिक पास सवलत योजना उपलब्ध होणार आहे. या पास योजनांचा मुख्य उद्देश नोकरी व व्यवसायाच्या निमित्ताने दररोज एकाच मार्गावर प्रवास करणाऱ्या नियमित प्रवाशांना ई-बस सेवेकडे आहे.

अतिवृष्टी मदत; सवलती जिल्ह्यातील सर्व तालुक्यांना लागू

## प्रशासनाने आवश्यक प्रक्रिया तत्काळ पूर्ण करावी : पालकमंत्री

■ राज्यात जून ते सप्टेंबर दरम्यान अतिवृष्टी व पूर आपत्तीमुळे बाधितांना मदत व सवलती शासनाने जाहीर केल्या आहेत. याबाबत आधीच्या निर्णयात सुधारणा करून अकोला, मुर्तीजापुरसह सर्व तालुक्यांचा समावेश करण्यात आला आहे. शासन आपद्ग्रस्त शेतकरी बांधवांच्या खंबीरपणे उभे आहे. निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक सर्व प्रक्रिया प्रशासनाने तत्काळ पूर्ण करून घ्यावी, असे निर्देश राज्याचे कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी दिले आहेत.

■अकोला,दि ११ (प्रतिनिधी) :



जून ते सप्टेंबर या कालावधीत अतिवृष्टी आणि पुरामुळे निर्माण झालेल्या आपत्तीच्या पार्श्वभूमीवर नुकसानीची दखल घेऊन शासनाने मदत आणि सवलती लागू करण्यास मान्यता दिली. त्याविषयीचा शासन निर्णय दि. ९ ऑक्टोबर रोजी निर्गमित करण्यात आला. या निर्णयात सुधारणा करून अकोट, बार्शिटाकळी, तेल्हारा, बाळापूर व पातूर यासह अकोला, मुर्तिजापूर या सर्व तालुक्यांचा समावेश करण्यात आला आहे.या निर्णयामुळे पूर आणि अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या शेतकरी बांधव आणि कुटुंबांना मोठा दिलासा मिळणार आहे, असा विश्वास पालकमंत्री ॲड. फुंडकर यांनी व्यक्त केला. जिल्ह्यातील सर्व तालुक्यांना आपत्तीग्रस्त घोषित करण्यात आले आहे. या तालुक्यातील सर्व बाधितांना दुष्काळसदृश्य परिस्थितीत लागू असणाऱ्या सर्व सवलती देण्यास शासनाने मान्यता दिली आहे. जमीन महसूलात सूट, सहकारी कर्जाचे पुनर्गठन, शेतीशी निगडित कर्जवसुलीस एका वर्षासाठी स्थगिती, तिमाही वीज देयकात माफी, परीक्षा शुल्कात माफी व १० वी आणि १२ वीच्या विद्यार्थ्यांची फी माफी जाहीर करण्यात आली आहे.

**असे आहे विशेष मदत पॅकेज**

शासनाने अतिवृष्टी व पूरग्रस्त बाधित क्षेत्रासाठी विशेष मदत पॅकेजही जाहीर केले आहे. पॅकेजनुसार जिरायत पिकांसाठी ८ हजार ५०० रू. प्रति हेक्टर, बागायत पिकांसाठी १७ हजार प्रति हेक्टर आणि बहुवार्षिक पिकांसाठी २२ हजार ५०० प्रति हेक्टर मदत मिळेल. नैसर्गिक आपत्तीमध्ये शेतजमिनीवरील गाळ काढण्यासाठी १८ हजार प्रति हेक्टर, तर जमीन खरडून गेली असल्यास अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना ४७ हजार प्रति हेक्टर मदत जाहीर करण्यात आली आहे.

पॅकेजनुसार आपतग्रस्त मृत व्यक्तीच्या वारसांना ४ लाख अर्थसाहाय्य मिळेल. ४० ते ६० टक्के अपंगत्व आल्यास ७४ हजार रू.,६० टक्क्यांहून अधिक अपंगत्व आल्यास अडीच लाख आणि जखमी व्यक्ती रुग्णालयात एका आठवड्याहून अधिक काळ दाखल असल्यास १६ हजार रू., तर त्याहून कमी काळ असल्यास ५ हजार ४०० रू. पर्यंत मदत मिळणार आहे. पूर्णतः नष्ट झालेल्या घरांसाठी (पक्क्या/कच्च्या) सपाट भागात १.२० लाख, तर डोंगराळ भागात १.३० लाख आणि अंशतः पडझड झालेल्या पक्क्या घरांसाठी ६ हजार ५०० व कच्च्या घरांसाठी ४ हजार रू.पर्यंत मदत दिली जाईल. झोपडी नुकसानासाठी ८ हजार रू, तसेच गोठ्याच्या नुकसानासाठी ३ हजार रू.ची मदत मिळणार आहे.मत्स्य व्यावसायिकांनाही बोटींची अंशतः दुरूस्तीसाठी ६ हजार व पूर्णतः नष्ट झालेल्या बोटीसाठी १५ हजार रू, तसेच जाळ्यांच्या दुरूस्तीसाठी निधी मिळणार आहे. त्याच प्रमाणे, जमीन महसूलात सूट, सहकारी कर्जाचे पुनर्गठन, शेतीशी निगडित कर्जवसुलीस एका वर्षासाठी स्थगिती, तिमाही वीज देयकात माफी, परीक्षा शुल्कात माफी व १० वी आणि १२ वीच्या विद्यार्थ्यांची फी माफी जाहीर करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे, रब्बी हंगामात शेतकऱ्यांना खते व बियाणे घेण्यासाठी प्रति हे. १० हजार रू. प्रमाणे ३ हेक्टरच्या मर्यादेत मदत कृषी विभागामार्फत बँक खात्यामध्ये जाईल.

एकाच रात्री दोन वेगवेगळया ठिकाणी सिडान कार चा वापर करुन

## गोवंश चोरी करून धुमाकुळ घालणाऱ्या टोळया स्थानीक गुन्हे शाखाकडुन जेरबंद



■अकोला,दि ११ (प्रतिनिधी) :

दिनांक २८/०९/२०२५ रोजी चे सकाळी ०३:०० ते ०४:०० वाजता चे दरम्यान कौलखेड चौकातील गजानन महाराज मंदीराजवळ मुख्य रस्त्यावरून एक गोवंश जातीची गाय स्वीफ्ट डिझायर मध्ये अज्ञात इसमांनी येवुन चोरी केली होती सदर घटनेचे सि. सि. टी. व्ही. फुटेज व्हायरल झाले होते तसेच सदर घटनेबाबत पो.स्टे. खदान येथे अप क्र. पो.स्टे. खदान अकोला येथील अप क्र. ७५८/२०२५ कलम ३०३ (२) भा.न्या.सं. चा दाखल झाला होता.तसेच त्याच रात्री पो.स्टे. बाळापुर हद्दीतील व्याळा येथील प्रकाश नथवाणी यांच्या घराजवळुन रात्री पांढ-या रंगाची गाय पांढ-या रंगाच्या सिडान कार मध्ये टाकुन अज्ञात चोरटयांनी चोरून नेली तसेच सदर घटनेबाबत पो. स्टे. बाळापुर अप क्र. ४६९/२५ कलम ३०३ (२) भा. न्या. सं. प्रमाणे दाखल करण्यात आला होता. दोन्ही घटनेचे सि. सि. टी. व्ही. फटेज व्हायरल झाल्याने अकोला शहरात हडकंप माजला होता त्याची सोशल मिडीया व ईलेक्ट्रॉनीक मिडीयाने देखील दखल घेतली होती.गोंवश चोरीचे गुन्हे घडत असल्याने त्याचे गांभीर्य लक्षात घेवुन मा. पोलीस अधीक्षक श्री. अर्चीत चांडक सा. यांनी स्था.गु.शा. अकोला चे प्रमुख पो. नि. शंकर शेळके यांना गोवंश चोरीचे गुन्हे उघडकिस आणण्याबाबत आदेशित करून सुचना दिल्याने पो. नि. शंकर शेळके स्था. गु.शा. अकोला यांनी गोंवश जातीचे जनावरे चोरीचे गुन्हाची उकल करणेकामी स.पो.नि. गोपाल ढोले

- गुन्हयात वापरलेले तीन सिडान कार सह १६,१७,०००/ रु. चा मुद्देमाल जप्त
- जिल्हयातील विविध पोलीस स्टेशन मधील एकुण ११ गुन्हे उघडकिस.
- एक स्वीफ्ट डिझायर व दोन होन्डा अमेज असे एकुण ०३ चारचाकी वाहन जप्त.
- एकुण रोख रक्कम १,५२,०००/रु व ३ मोबाईल असा एकुण १६,१७,०००/रूपयांचा मुद्देमाल जप्त

व त्यांचे पथकातील अंमलदार पो. हवा. शेख हसन, अब्दुल माजीद, वसिमोद्दीन, किशोर सोनोने, एजाज अहमद यांचे पथक गठीत करून त्यांना योग्य मार्गदर्शन दिले.सदर पथकाने गोपनिय माहिती व तांत्रीक विश्लेषणावरून आरोपीतांची माहिती घेतली असता गोवंश चोरी करणारे आरोपी हे मुबंई येथे असल्याचे निष्पन्न झाले होते. त्यांनतर ते जिल्हा अजमेर राज्य राजस्थान येथे असल्याची माहिती मिळल्याने आरोपी अटक करणेकामी सदरील पथक रवाना झाले.सदरील पथकाला आरोपी हे अजमेर येथुन निघाले असुन ते इंदौर मार्गे अकोला कडे येत असुन ते सध्या इंदौर वरून अकोला कडे रवाना झाल्याचे समजल्याने पोलीस पथकाने मुक्ताईनगर येथील बस स्थानक येथे सापळा रचुन आरोपी नामे १) शेख रेहान शेख रशीद, वय २२ वर्ष, रा. पिंजारी गल्ली, कच्ची मस्जीद मागे, मच्छी मार्केट अकोला २) मिर्झा शोएब बेग मिर्झा अजहर बेग, वय २८ वर्ष, १६०० प्लॉट अकोट फाईल अकोला नमुद दोन्ही गुन्हयाची कबुली दिली.

## ग्रामीण भागातील पाणी पुरवठा तसेच खांबोरा व ६० गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजना तातडीने पुर्ण : आ . रणधीर सावरकर

■अकोला,दि ११ (प्रतिनिधी) :



ग्रामीण भागातील पाणीपुरवठा योजना वेळेमध्ये तातडीने पूर्ण करा तसेच यावर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे ज्या ठिकाणी पाणी पुरवठा योजना नुकसान झालेले आहे त्याची दुरुस्ती सुद्धा तातडीने करा अशा सूचना आमदार रणधीर सावरकर यांनी मजीप्राच्या पाणीपुरवठा योजनेच्या आढावा बैठकीत अधिकाऱ्यांना दिल्या वाढती लोकसंख्या आणि जुनी झालेली पाणी वितरण व्यवस्था लक्षात घेता शासनाच्या जलजीवन मिशन योजनेअंतर्गत ग्रामीण भागातील पाणीपुरवठ्याच्या योजना नव्याने बांधकामाधीन आहे खारपाणपट्टयातील खांबोरा ६० गावे , ग्रामीण पाणी पुरवठा योजना व योजनेतील वितरण व्यवस्थेमध्ये नवीन पाईप लाईन तसेच उंच टाक्या व सुधारित वितरण प्रणाली टाकण्याचे काम सुरू आहे. या योजनेच्या कामाच्या प्रगती बाबत चा आढावा मजीप्राचे अधीक्षक अभियंता यांच्या कार्यालयात आज आमदार सावरकर यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आला बैठकीच्या सुरुवातीला आमदार सावरकरांनी विचारणा केली की यापूर्वीच्या बैठकीमध्ये देण्यात आलेल्या सूचनाबाबत काय कारवाई केली याबाबतची माहिती घेतली तसेच बऱ्याच ठिकाणी पाण्याचा डिस्चार्ज वाढल्यामुळे वितरण व्यवस्थेवर एअर हॉल बसविणे गरजेचे आहे असे असतांना अंदाजपत्रकात याबाबत पुरेशी तरतूद केली नसल्याने आमदार सावरकरांनी नाराजी व्यक्त केली तसेच मागील बैठकीत पळसो झोन मधील वितरण व्यवस्था चाचणी घेण्याच्या सूचना करण्यात आल्या होत्या.

त्याचे सुद्धा पालन झाल्याचे दिसून न आल्याने आमदार सावरकरांनी अधिकाऱ्यांप्रती नाराजी व्यक्त केली. चाचोंडी गावामध्ये उंच टाक्यांची बांधकाम तसेच पाईपलाईनचे जाळे टाकण्याकरिता खोदून ठेवलेले रस्ते दुरुस्त करण्यात आले नाहीत याबाबत चाचोंडी येथील ग्रामस्थ बैठकीमध्ये उपस्थित झाले असता सदरचे रस्ते तातडीने दुरुस्त करा तसेच खोदल्याच्या रस्त्यांच्या दुरुस्तीकरिता अंदाजपत्रकात तरतूद नाही.

त्यामुळे अशा चुकीच्या अंदाजपत्रकाबाबत दोषींवर कारवाई करण्याच्या सूचना आमदार सावरकरांनी दिल्या, बैठकी करिता अलीयाबाद, चाचोंडी येथील ग्रामस्थ अकोला भाजपाचे शहर प्रमुख जयंत मसणे विवेकजी भरणे आदि पदाधिकारी उपस्थित होते.

## अखेर बाजार वसुलीच्या निविदा प्रसिद्ध

**अकोला** : महापालिकेच्या बाजार वसुलीच्या निविदेचा मार्ग मोकळा झाला आहे. प्रशासक डॉ. सुनिल लहाने यांनी या अनुषंगाने ठराव मंजुर केल्या नंतर या निविदा प्रसिद्ध करण्यात आल्या. १५ ऑक्टोंबर पर्यंत निविदा दाखल करता येणार आहेत. यातून महापालिकेला वर्षाकाठी दोन कोटी रुपयाचा महसुल अपेक्षित आहे.शहरात रस्त्यालगत तसेच महापालिकेने निश्चित केलेल्या जागेवर हातगाडी अथवा खाली बसुन व्यवसाय करणाऱ्यांकडून दररोज शुल्क आकारले जाते. महापालिकेने दैनंदिन बाजार वसुलीचे काम ठेका पद्धतीने दिले होते. मात्र ३१ डिसेंबर रोजी स्वाती कंपनीचा ठेका रद्द करण्यात आला. तेव्हा पासून बाजार वसुलीचे काम महापालिकेचे कर्मचारी करीत आहेत.

अकोला जि.प.कर्मचाऱ्यांच्या विविध संघटनांची सभा संपन्न

## सेवानिवृत्तांसह कार्यरत कर्मचाऱ्यांच्या समस्या नियामोचित पद्धतीने तातडीने निकाली काढू : सि.ई.ओ.अनिता मेश्राम





■अकोला,दि ११ (प्रतिनिधी) :

जिल्हा परिषदेमधील सर्व संवर्गाच्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांसह इतरही कार्यरत कर्मचाऱ्यांच्या समस्या तातडीने निकाली काढण्याचा आपण सर्वतोपरी प्रयत्न करू. काही समस्या दिवाळीपूर्वीच मार्गी लावून कर्मचाऱ्यांची दिवाळी आनंदी करण्याचा प्रयत्न करू असे भरीव आश्वासन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती अनिता मेश्राम यांनी दिले. जिल्हा परिषदेच्या सेवानिवृत्त कर्मचारी संघटनेसह इतरही सर्व संवर्गाच्या संघटनांच्या पदाधिकाऱ्यांची एक महत्त्वपूर्ण सभा जि. प. च्या छत्रपती शाहू महाराज सभागृहात संपन्न झाली.

त्यात विविध समस्या व मागण्यांचा आढावा घेताना त्यांनी ज्या समस्या जिल्हा परिषद स्तरावर नियामोचित पद्धतीने सोडविता येतील त्या तात्काळ निकाली काढू. तसेच राज्य शासनाच्या १५० दिवसांचा कृती कार्यक्रम यामध्ये प्राधान्याने आस्थापनाविषयक बाबीचा समावेश असल्याने आपण सर्व कर्मचारी यांनी त्यात सहभागी होऊन अकोला जिल्हा परिषद राज्यात प्रथम क्रमांकावर येण्याकरिता सर्व कर्मचारी यांनी प्रयत्न करावेत.

अशी अपेक्षा कर्मचारी संघटनेकडून व्यक्त केली. या सभेत सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी दिगंबर लोखंडे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मायाताई शिर्के, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बळीराम गाढवे यांचे सह इतरही विभाग प्रमुख प्रामुख्याने उपस्थित होते.

## थोडक्यात

### पोलिस मुख्यालयात तणाव व्यवस्थापन कार्यशाळा

**अकोला:** अकोला पोलिस दल आणि लायन्स क्लब, अकोला एलिट यांच्या संयुक्त विद्यमाने १० ऑक्टोबर- विश्व मानसिक आरोग्य दिन या निमित्ताने 'तणाव व्यवस्थापन कार्यशाळा' चे आयोजन करण्यात आले. अकोला पोलिस मुख्यालयात आयोजित कार्यशाळेला मानसोपचार तज्ज्ञ डॉ. दीपक केळकर यांनी मार्गदर्शन केले. डॉ. केळकर यांनी - पोलिस कर्मचाऱ्यांना त्यांच्या रोजच्या कार्यातील मानसिक ताण, झोपेची समस्या, राग, नैराश्य व कौटुंबिक संघर्ष हाताळण्यासाठी प्रत्यक्ष वापरता येतील अशा सोप्या व प्रभावी तंत्रांची माहिती दिली. त्यांनी श्वसन नियंत्रण, विचारांचे निरीक्षण आणि सकारात्मक स्वसंवाद या तंत्रांचा दैनंदिन जीवनात वापर कसा करावा हे सविस्तरपणेसांगितले. याप्रसंगी पोलीस अधीक्षक आर्चित चांडक यांनी विश्व मानसिक आरोग्य दिनानिमित्त बोलताना सांगितले की, पोलिस कर्मचाऱ्यांचे कार्य अत्यंत तणावपूर्ण असते. त्यामुळे त्यांच्या मानसिक आरोग्याकडे लक्ष देणे अत्यंत गरजेची बाब आहे. त्यांनी सर्व पोलिस दलाने नियमित ध्यान, व्यायाम आणि सकारात्मक संवाद यांचा अंगीकार करावा असे आवाहन केले. लायन्स क्लब डिस्ट्रिक्ट गव्हर्नर अश्विन कुमार बजोरिया यांनीदेखील याप्रसंगी मार्गदर्शन केले. त्यांनी समाजात मानसिक आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करणे काळाचे अत्यावश्यक भान असल्याचे सांगितले.

## सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या वर केलेल्या गैरवर्तनाचा निषेध व कारवाई ची मागणी

■अकोट,दि ११ (प्रतिनिधी) :



भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांना त्यांच्या दालनात जाऊन गैरवर्तन करणाऱ्याचा नारी शक्ती एकता संघर्ष फाऊंडेशन च्या वतीने निषेध व्यक्त करण्यात येऊन संबंधित गैरवर्तन करणाऱ्या त्या व्यक्तीवर योग्य ती कारवाई करण्यात यावी अशा आशयाचे निवेदन अकोट चे उपविभागीय अधिकारी लोणारकर यांच्या मार्फत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी जी यांना देण्यात आले आहे.सदर निवेदनाच्या प्रती मा. राष्ट्रपती नवी दिल्ली, सरन्यायाधीश भूषण गवई, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना देण्यात आल्या आहेत. सदर निवेदनावर नारी शक्ती एकता संघर्ष फाउंडेशन चे संस्थापक राजकुमार वानखडे, अध्यक्ष संगीता प्रभे, उपाध्यक्ष अमिदाबी, सचिव चंदा प्रभे, सहसचिव विद्या गावंडे, कोषाध्यक्ष कविता वानखडे, सहकोषाध्यक्ष उज्वला डोबाळे, केंद्रीय सदस्य सविता भागवतकर, छाया धोंडेकर, प्रणाली बिजेकर, अंतकला जुमळे, शुभांगी मोहीते, स्वप्निल सरकटे,अजय प्रभे,सागर वडतकार, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षा मिनाक्षी इंगळे, , यांच्या सह अनेक कार्यकर्ते व पदाधिकारी यांच्या सह्या आहेत.

## पंधरा दिवसात ११ उपरोक्त गावांचा डोंगरी भागात समावेशाची दखल न घेतल्यास आमरण उपोषणाचा इशारा! : ॲड महेश शिंदे

■पातुर,,दि ११ (प्रतिनिधी) :

ग्राम झरंडी, वसाली, उमरवाडी, गोंधळवाडी, वनदेव,पांगरताटी,सती,आसोला, पिंपरडोळी, पळसखेड,पाडसिंगी, या गावांचा डोंगरी विभागात सहभाग करुन घ्यावा, यासाठी जिल्हाधिकारी अकोला तसेच अनुप धोत्रे युवा खासदार,अकोला, व आमदार रणधिर सावरकर , यांना यावेळी निवेदन देऊन ह्या गावांचा डोगरी विभागात सहभाग करून घेण्यात यावा यासाठी मागणी केली.

निवेदन देउन १५ दिवसाच्या आत समित गठीत करुन सदर गावांची मोका पाहणी तसेच सर्वे करण्यात यावे .आणि या गावांचा डोंगरी विभागाच्या यादि मधे सहभाग करुण घेण्यात यावा.१५ दिवसात प्रशासनाने दखल न घेतल्यास ॲड.महेश गजाननराव शिंदे हे व ग्राम झरंडी, वसाली, उमरवाडी, गोंधळवाडी, वनदेव,पांगरताटी,सती,आसोला,पिंपरडोळी, पळसखेड,पाडसिंगी, सर्व प्रतिष्ठीत नागरीक सहकारी आमरण उपोषणाला बसण्याचा ईशारा, निवेदन देते वेळी प्रशासनाला देण्यात आला आहे.



## राष्ट्र सेविका समितीचा विजयादशमी उत्सव आज

■अकोला,दि ११ (प्रतिनिधी) :

येथील राष्ट्रसेविका समितीने विजयादशमी उत्सव व शस्त्रपूजन कार्यक्रमाचे आयोजन रविवार १२ ऑक्टोबर रोजी केले आहे.जुन्या शहरातील डाबकी रोड भागातील गोडबोल प्लॉट मधील खंडेलवाल कॉलेजमध्ये संध्याकाळी ५ वाजता हा कार्यक्रम होणार आहे.

या कार्यक्रमात प्रमुख वकब त्या म्हणून समितीच्या अखिल भारतीय शारीरिक प्रमुख नागपूरच्या मनीषा संत राहणार असून प्रमुख अतिथी म्हणून कर अधिकारी वैशाली अपार राहणार आहेत. राष्ट्र सेविका समितीच्या या विजयादशमी उत्सवास नागरिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन समितीच्या अकोला नगर कार्यवाहिका वैशाली देशपांडे यांनी केले आहे.

## अतिवृष्टीग्रस्त कास्तकारांना मोबदला देण्याची राष्ट्रवादीची मागणी

■अकोला,दि ११ (प्रतिनिधी) :

राज्य शासनाकडून अतिवृष्टी भागाची यादी जाहीर करताना शासनाच्या वतीने अकोला जिल्ह्यातील अकोला तालुका व मुर्तीजापुर तालुका येथील अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना वगळण्यात आले. या दोन्हीही तालुक्यातील शेतकरी बांधवांना तात्काळ सुधारित आदेश काढून अतिवृष्टीग्रस्त भाग म्हणून जाहीर करावा व त्यांना त्याचा मोबदला द्यावा याकरिता राष्ट्रवादी जिल्हाध्यक्ष संग्रामभैय्या गावंडे यांच्या मार्गदर्शना त जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले.

जर या तालुक्यांचा समावेश अतिवृष्टी ग्रस्त भागात नाही झाला तर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा सुद्धा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून यावेळी देण्यात आला होता.यावेळी पक्षाचे जिल्हा महासचिव आनंद पिंटू वानखडे, अकोला तालुकाध्यक्ष अजय पागृत, जिल्हा उपाध्यक्ष परिमल लहाने, श्रीधर मोरे, राजेश राऊत, सामाजिक न्याय जिल्हाध्यक्ष गजानन भटकर, सुनिता ताथोड, सामाजिक न्याय महिला जिल्हाध्यक्ष कोकीळा वाहूरवाघ, युवती अध्यक्ष मेघा पाचपोर, शामराव वाहूरवाघ, शिवाजीराव भरणे, बाबुराव गावंडे, विद्यार्थी प्रदेश सचिव शैलेश बोदडे, विवेक पाचपोर, संजयजी पांडे, सतीश बोर्डे, एस के पांडे, सदानंद काळकर, गणेश गोंडचोर,अमित जयस्वाल, नंदकिशोर काकड, रमेश शिराळे, प्रमोद पागृत, प्रवीण चोटमल, राजू इंगळे, रुपेश कांबले समवेत शेतकरी तथा पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## सीताबाई महाविद्यालयात संस्कृत संभाषण वर्ग सुरू

■अकोला,दि ११ (प्रतिनिधी) :

संस्कृत भाषा ही जगातील सर्व भाषांची जननी असून या भाषेच्या उच्चारणातून बोलणे सुधारते व अनेक बाबी प्राप्त होतात.मधल्या काळात संस्कृत भाषेकडे दुर्लक्ष करण्यात आल्याने अनेकांना या भाषेबाबत माहिती नव्हती.मात्र आता गेल्या काही वर्षांपासून त्यावर भर देण्यात येत आहे.या अनुषंगाने येथील सीताबाई आर्टसब,सायन्स आणि कॉमर्स महाविद्यालयाच्या खोली क्र.५ मध्ये संस्कृत भारतीतर्फे संस्कृत संभाषण वर्ग सायंकाळी ५ ते ६ या वेळेत सुरू झाले आहेत. शहरातील संस्कृत प्रेमी जन आणि विद्यार्थ्यांनी या वर्गांचा लाभ घ्यावा असे आवाहन संस्कृत भारतीने केले आहे.मुकुंद मंदिरात स्तोत्र पठण वर्ग शिवाय येथील रामदासपेठेतील टिळक पार्क जवळील मुकुंद मंदिरात स्तोत्र पठण वर्ग घेतले जात आहेत.सोमवार ते शुक्रवार या दिवशी सायंकाळी ७.३० वाजता जयश्री देशमुख यांच्या मार्गदर्शनात हे वर्ग होत आहेत.ज्यांना स्तोत्र शिकण्याची इच्छा आहे त्यांनी या वर्गाचा लाभ घ्यावा.

## आगरकर संशोधन संस्थेत भरती प्रक्रिया

**अकोला :** आगरकर संशोधन संस्था पुणे अंतर्गत प्रकल्प सहायक पदाची रिक्त जागा भरण्यासाठी पात्र असणाऱ्या उमेदवारांकडून अर्ज मागवण्यात येत आहे. अर्ज ऑनलाइन पद्धतीने करायचा आहे. अर्ज करण्याची शेवटची तारीख १५ ऑक्टोबर आहे.

## माना पोलीसांची मोठी कामगिरी-चोरीचा गुन्हा उघड



**■मुर्तिजापुर,दि ११ (प्रतिनिधी) :**
– माना पोलीसांकडुन बक-या चोरीचा गुन्हा उघड, आरोपी कडुन ०४ लाख ४९ हजार रूपये चापोलीस स्टेशन माना येथे दि ०२.१०.२०२५ रोजी फिर्यादी अनिल रामदास साबळे वय ५५ वर्ष रा. राजनापुर खिनखिनी ता. मुर्तिजापुर जि. अकोला यांचे जबानी रिपोर्ट वरून अप क २४५ / २५ कलम ३०५(अ),३३४(१), बीएनएस अन्वये गुन्हा नोंद असुन सदर गुन्हयातील फिर्यादी याचे गोठयाचा टिन वाकवुन टिणातुन गोठयात प्रवेश करून लहान मोठया चित-या बित-या रंगाच्या ०८ बक-या किंमत अंदाजे ५६,००० रु व एक बोकड काळया रंगाचा वय ०२ वर्ष किंमत अंदाजे ०७,००० रूपये असा एकुण ६३,००० रूपये चा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात इसमाणे चोरून नेल्याबाबत जबानी रिपोर्ट दिला होता.

सदर गुन्हयाचे तपासात गुन्हयाचे घटनास्थळाचे आजूबाजूला तसेच गावापासून बरेच अंतरावर कोठेही सीसीटीव्ही कॅमेरे नव्हते तसेच अज्ञात आरोपीबाबत कोणतीही तांत्रिक माहीती उपलब्ध होत नसल्याने माना पोलीसांनी तपास कौशल्याचा वापर करून त्यांची गोपणीय यंत्रण सक्रिया करून अज्ञात आरोपी बाबत अकोला, वाशिम व अम रावती जिल्हयातून गोपणीय माहिती काढली असता माना पोलीसांना गोपणीय माहिती मिळाली की, ग्राम टाकरखेड शंभु ता भातकुली जि अमरावती येथिल आरोपी नामे अजिम शाह कलीम शाह उर्फ बबलु वय ३५ वर्ष रा टाकरखेड याने सदरचा गुन्हा केला आहे त्यावरून मा. पोलीस अधिक्षक श्री. अर्चित चांडक साहेब यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथक रवाना केले असता तपास पथकाने नमुद आरोपीला ताब्यात घेवुन विचारपुस करून आरोपीचे ताब्यातुन चोरीला गेलेल्या ०९ बक-या पैकी ०७ बक-या किमत ४९,००० रूपये व आरोपीने सदरचा गुन्हा करतांना वापरलेले टाटा एस कंपनीचे वाहन क्रमांक एमएच ३८ ई १०५८ ज्याची किंमत ४,००,००० रूपये असा एकुन ४,४९,००० (०४ लाख ४९ हजार) रूपयाचा मुददेमाल जप्त करून सदरचा गुन्हा उघडकीस आणला आहे.सदर ची कार्यवाही मा. पोलीस अधिक्षक श्री. अर्चीत चांडक साहेब, मा. अप्पर पोलीस अधिक्षक श्री. बदेली चंद्रकांत रेडडी साहेब, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी उपविभाग मुर्तिजापुर सौ. वैशाली मुळे मॅडम, व स्थानिक गुन्हे शाखा अकोला चे पोलीस निरीक्षक श्री. शंकर शेळके यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन माना चे ठाणेदार गणेश नावकार यांच्या नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक पोहेकॉ दिपक सोळंके, पो. शि. आकाश काळे यांनी केली.

## शिवाजी पार्क येथे शिवकालीन गेटची उभारणी करावी!

**अकोला :** अकोला शहरातील शिवाजी कॉलेजजवळील शिवाजी पार्क येथे भव्य शिवकालीन गेटची उभारणी करण्यात यावी तसेच जिजाऊ हॉल अकोला येथे माँ आय जिजाऊंचा पूर्णाकृती पुतळा उभारून जिजाऊ हॉल मनपाकडे वर्ग करण्यात यावा, अशी मागणी वंचितच्या वतीने मनपाआयुक्तांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

# व्यावसायिक शाश्वत शेती तंत्रज्ञानाचा अवलंबच देशाला आत्मनिर्भरतेकडे अग्रेसीत करणारा आहे : आ.अमोल मिटकरी

**■अकोला,दि ११ (प्रतिनिधी) :**
देशांतर्गत शेती शाश्वत होत शेतकरी संपन्न होण्यासाठी केंद्र आणि राज्य शासनाद्वारे अनेकानेक कालसुसंगत योजनांची अंमलबजावणी होत असून आर्थिक संपन्न शेतकरी हाच संकल्प असल्याचे विश्वास दर्शक प्रतिपादन देशाचे पंतप्रधान मा.नरेंद्र मोदी यांनी केले, आज राष्ट्रीय कृषी विज्ञान परिसर पुसा नवी दिल्ली येथे 'प्रधानमंत्री धन-धान्य कृषि योजना व कडधान्य आत्मनिर्भरता मि शनसह कृषि पायाभूत सुविधा निधीसह विविध प्रकल्पांचे उदघाटन तथा पायाभरणी प्रसंगी प्रत्यक्षरीत्या उपस्थित तथा आभासी माध्यमातून देशभरातील विविध कृषि विषयक संस्थाचे प्रक्षेत्रावर आयोजित विशेष कार्यक्रम प्रसंगी ते बोलत होते. आपल्या अत्यंत प्रभावी आणि वास्तविक संबोधनातून माननीय पंतप्रधानांनी आत्मनिर्भर देश निर्मितीमध्ये ग्रामीण भारताचे विशेषतः शेती क्षेत्राचे योगदान अधोरेखित करत केंद्रशासनाच्या भविष्यातील योजनांचा देखील लेखाजोखा मांडला. याप्रसंगी केंद्रीय कृषिमंत्री मा. ना. शिवराज सिंह चौहान यांनी देखील समायोजित मार्गदर्शन केले.

याच कार्यक्रमाचा भाग म्हणून डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला, कृषी विभाग महाराष्ट्र शासन, प्रकल्प संचालक आत्मा, जिल्हास्तरीय उमेद अभियान व पाणी फाउंडेशन यांचे संयुक्त विद्यमातून रब्बी-उन्हाळी हंगाम नियोजना संदर्भात एक दिवसीय शेतकरी मार्गदर्शन



कार्यक्रमाचे आयोजन कृषी महाविद्यालय, अकोलाच्या स्व. के आर ठाकरे सभागृहात केले होते. विस्तार शिक्षण संचालक डॉ धनराज उंदीरवाडे यांच्या अध्यक्षतेत संपन्न झालेल्या या शेतकरी मार्गदर्शन कार्यक्रमाचे प्रसंगी विद्यापीठ कार्यकारी परिषदेचे सदस्य तथा विधान परिषद सदस्य मा. आ. अमोल मिटकरी यांची विशेष उपस्थिती होती.

याप्रसंगी उपस्थित शेतकरी बंधू भगिनींना उद्घाटनपर मार्गदर्शन करताना आ. मिटकरी यांनी यंदाच्या खरीप हंगामात अनियंत्रित पावसामुळे झालेल्या नुकसानीवर पोटतिडकीने बोलतांना कृषी विद्यापीठाद्वारे संशोधित पिकवाण उत्पादन तंत्रज्ञान आणि यंत्र अवजारांचा काटेकोर वापर काळाची गरज असल्याचे सांगत बीबीएफ, अतिघन लागवड पद्धत, सेंद्रिय नैसर्गिक व गरजेनुसार इतर निविष्ठांच्या एकात्मिक वापरातून व्यावसायिक शाश्वत शेती तंत्रज्ञानाचा अवलंबच देशाला आत्मनिर्भरतेकडे अग्रेसीत करेल असे देखील प्रतिपादन केले व आज देशाचे लोकप्रिय पंतप्रधान माननीय नरेंद्र मोदी साहेबांच्या दूरदृष्टीतून लोकार्पण होत असलेल्या प्रधानमंत्री धन-धान्य कृषी योजना व कडधान्य आत्मनिर्भरता मिशन सोबतच विविध उपक्रमांचा प्रभावी वापर करीत फायदेशीर शेतीची संकल्पना कृतीत आणावी व राज्य तथा केंद्र शासनाच्या माध्यमातून शाश्वत ग्राम विकास साधावा असे आवाहनही याप्रसंगी केले.

# छत्रपती शाहू सार्वजनिक वाचनालयाचे वतीने ग्रंथ प्रदर्शनी

**■अकोला,दि ११ (प्रतिनिधी) :**
महाराष्ट्र राज्यातील सर्व शासकीय व निम शासकीय कार्यालये ,केंद्र व राज्य शासनाच्या अखत्यारीतील सर्व कार्यालये यांना संशोधन संवर्धन व जन जागृती व्हावी या उद्देशाने दरवर्षी दिनांक ३ ऑक्टोबर हा दिवस अभिजात म राठी भाषा दिवस व दिनांक ३ ऑक्टोबर ते नऊ ऑक्टोबर या कालावधीमध्ये अभिजात मराठी भाषा सप्ताह विविध उपक्रमाने साजरा करण्याबाबत शासनाने केलेल्या आदेशा नुसार छत्रपती शाहू सार्वजनिक वाचनालय, हनुमान नगर, अकोलाचे वतीने दिनांक ९-१०- २०२५ रोजी ग्रंथ प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले. ग्रंथ प्रदर्शनीचे उद्घाटन संत गाडगेबाबा सार्वजनिक वाचनालयाचे अध्यक्ष तथा अकोला जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष श्री शामराव वाहूरवाघ यांचे हस्ते दीप प्रज्वलन व डॉ. एस. आर .रंगनाथन यांचे प्रतिमेचे पूजन करून व पुष्पहार अर्पण करून करण्यात आले. याप्रसंगी अभिजात मराठी भाषा या विषयावर श्री शामरावजी वाहूरवाघ यांनी मार्गदर्शन करून मराठी भाषेचे व वाचनाचे



महत्त्व विशद केले कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी सौ.शकुंतला शिंदे उपस्थित होत्या.

त्यांनी नेहमीच स्तुत्य उपक्रम राबविणाऱ्या छत्रपती शाहू वाचनालयाचा फायदा परिसरातील नागरिकांनी घ्यावा असे आवाहन याप्रसंगी केले. कार्यक्रमाला ग्रंथपाल सौ. दीपिका मुळे, सौ अंजली देशमुख, मीनाक्षी मुळे ,अरुण वाघ, एड. मेडशीकर श्री हिवसे,विक्रांत मुळे, किशोर प्रांजळे, उद्धवराव ठाकरे, विलास नाकट, अशोक बोंद्रे ,गणेशराव काकड, गजानन कंडारकर, राजाभाऊ शेरेकर, सुनील वानखडे, अभय भेंडे ,ऋषिकेश घुईकर, श्याम काळे ,गणेश वडतकर उपस्थित होते. श्रेयश हिवसे, आशाताई नावकार, तसेच डॉ. शशिकांत पवार, विलास काळे, नागोराव चव्हाण, एड. चेतन यादव, काशिनाथ तिकोडे , मनोहर पाटील ,लक्ष्मण जाधव , राजेश जाधव, आशाताई पवार ,अनिल शिंदे आदि मान्यवरासह हनुमान नगर, वृंदावन नगर, गणेश पेठ ,उमरी परिसरातील नागरिकांनी उस्फूर्त प्रतिसाद देऊन ग्रंथ प्रदर्शनीचा लाभ घेतला. कार्यक्रमाचे संचालन ग्रंथपाल सौ .दीपिका मुळे यांनी तर आभार सौ. अंजलीताई देशमुख यांनी मानले.

# अकोला जिल्हा ग्रामीण भाजपा महिला मोर्चाची जंबो कार्यकारिणी जाहीर

### सबका साथ-सबका विकास-सबका प्रयास या ध्येयाने सशक्त महिलांची एकजूट

**■तेल्हारा,दि ११ (प्रतिनिधी) :**
भारतीय जनता पार्टी अकोला जिल्हा ग्रामीण महिला मोर्चाच्या जंबो कार्यकारिणीची घोषणा जिल्हा अध्यक्ष जयश्री पुंडकर यांनी केली. ङ्गसबका साथ, सबका विकास, सबका प्रयासङ्क या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विचारसरणीवर आधारित ही कार्यकारिणी रचना करण्यात आली आहे. पक्ष संघटन अधिक बळकट करण्यासाठी विविध घटकांतील आणि स्तरांवरील महिलांना यात प्राधान्य देण्यात आले आहे.या कार्यकारिणीबाबत भाजपाचे प्रदेश सरचिटणीस आमदार रणधीर सावरकर, खासदार अनुप धोत्रे, पालकमंत्री आकाश फुंडकर, संघटनमंत्री डॉ. उपेंद्र कोठेकर, माजी केंद्रीय



मंत्री संजय धोत्रे, महिला मोर्चा प्रदेश अध्यक्षा आमदार चित्रा वाघ, तसेच जिल्हाध्यक्ष संतोष शिवरकर, माजी जिल्हाध्यक्ष तेजराव थोरात, किशोर मांगटे पाटील यांच्यासह अनेक वरिष्ठ नेत्यांशी सल्लामसलत करण्यात आली.जयश्री पुंडकर यांनी ज्येष्ठ कार्यकर्त्यांचा सल्ला घेऊन आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती व नगर परिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर महिलांचा सहभाग वाढवण्यासाठी ही कार्यकारिणी जाहीर केली. ङ्गप्रत्येक गावात, प्रत्येक नगरपालिकेत भारतीय जनता पक्षाचा झेंडा फडकवायचा आहे, असे त्यांनी सांगितले. नवीन कार्यकारिणीत अनुभवी तसेच तरुण कार्यकर्त्यांचा समावेश आहे.सरचिटणीसपदी मूर्तिजापूरच्या माजी नगराध्यक्ष मोनाली गावंडे आणि अकोटच्या माजी नगरसेविका माया धुळे यांची पुनर्नियुक्ती करण्यात आली.उपाध्यक्ष म्हणून शालिनी हजारे, रेखा गोतरकर, प्रतिभा धमाळे आणि छाया मानकर यांची नियुक्ती झाली.सचिवपदी प्रिया महल्ले, मीना नकासकर, सुनिता बगाडे आणि शितल गावंडे यांची निवड करण्यात आली. कोषाध्यक्ष म्हणून कल्पना पोहणे, प्रसिद्धीप्रमुख म्हणून ज्योती टाले आणि सोशल मीडिया प्रमुख म्हणून गौरी चव्हाण यांच्यावर जबाबदारी सोपविण्यात आली आहे.सदस्यपदी मनीषा विजेकर, दिपाली तिडके, पल्लवी नेमाडे, चुळसा गाडगे, मंजुषा लोथे, रेखा भाकरे, कुसुम जायले, सिंधू गडम, चंदा आमले, पल्लवी कदम, प्रतिभा येऊन, वंदना लोणकर, अनिता देवीकर, अनिता पवार, रूपल गुजराती, ज्योती ठोकळ आणि स्वाती गंभीरे यांचा समावेश आहे.

# इंग्रज हे हिंदू मुस्लिम वादाचे खरे सूत्रधार-अन्वर राजन

**■अकोला,दि ११ (प्रतिनिधी) :**
हिंदू -मुस्लिम वाद हा आपल्या मनावर अगदी लहानपणापासून बिंबवला गेला आहे. हिंदू-मुस्लिम वैमनस्य सारख्या आंतरिक बाबी डोक्यातून काढणे एक मोठे आज आव्हान ठरत आहे.

हा प्रश्न जाणून बुजून उभा करण्यात आला आहे. तथापि या मूळ वादाचे खरे सूत्रधार हे इंग्रज होते. त्यांनी हा वाद ब्रिटिश आमदानीत निर्माण केला असून तो प्रत्येक भारतीयाच्या मनावर बिंबवण्याचा पद्धतशीर प्रयत्न केला असल्याचे मत पुणे येथील व्याख्याता अन्वर राजन यांनी व्यक्त केले. बाबूजी देशमुख वाचनालयाच्या वतीने स्थानीय प्रमिलाताई ओक सभागृहात सुरू असलेल्या ९ दिवसीय नवरात्र व्याख्यान मालेत शनिवारी अन्वर राजन यांनी हिंदू, मुस्लिम प्रश्न आणि राष्ट्रीय एकात्मता या विषयावर आठवे पुष्प गुंफले.

ते पुढे म्हणाले, ब्रिटिश भारतात आल्यावर त्या काळात हिंदू -मुस्लिमांचा फारसा वाद नव्हता. दोन्ही धर्म गुण्यागोविंदाने या देशात नांदत होते. मात्र इंग्रज हे राज्यकर्ते झाल्यावर हिंदू- मुस्लिमांचे एक्य अबाधित राहिले.


## सार्वजनिक सूचना

आपणास कळविण्यात येते की, सौ. राजश्री प्रमोद बोर्डे या आपल्या मालकीच्या खाली नमूद केलेल्या मालमत्तेवर पिरामल फायनान्स, अकोला यांचेकडून कर्ज मिळविण्यासाठी तारण ठेवण्याचा मनोदय व्यक्त करीत आहेत.

मौजा – टाकळी जलम, ग्रामपंचायत टाकळी जलम हद्दीत, तालुका – अकोला, जिल्हा – अकोला येथे स्थित, आर.सी.सी. बांधकामासह खुला भूभाग, क्षेत्रफळ ३२ फूट २० फूट ६४० चौ.फु., ग्रामपंचायत मिळकत क्र. ९५ असलेली संपूर्ण मालमत्ता.

वरील मालमत्ता ही पूर्णतः सौ. राजश्री प्रमोद बोर्डे यांच्या एकमेव व निर्विवाद मालकीची असून, इतर कोणत्याही व्यक्तीचा त्या मालमत्तेवर कोणताही हक्क, दावा, स्वारस्य, मालकी हक्क किंवा अडथळा नाही.

म्हणून, जर कोणत्याही व्यक्तीस वरील मालमत्तेबाबत कोणताही दावा, हरकत, हक्क, स्वारस्य अथवा कायदेशीर अडथळा असल्यास, त्यांनी आपल्या लेखी हरकतीसह आवश्यक पुरावे या सूचनेच्या प्रकाशनानंतर त्वरित खाली दिलेल्या पत्त्यावर सादर करावेत.

नोंद घ्यावी की, या सूचनेच्या प्रकाशनानंतर प्राप्त होणाऱ्या कोणत्याही हरकती किंवा दावे ग्राह्य धरले जाणार नाहीत आणि तारण प्रक्रिया नियमानुसार पुढे सुरू राहील.

ही जाहीर सूचना वर्तमानपत्रामार्फत प्रसारित करण्यात येत असून, यानंतर प्राप्त होणाऱ्या हरकतींचा विचार करण्यात येणार नाही.

ॲड. रुचा देशमुख
मो. क्र. ७७७४०१२१८४
कार्यालय – कक्ष क्र. २१०, अ विंग,
लोकमत बिल्डिंग, रामदासपेठ, नागपूर

## नावात बदल

मी महिजबीन मोहम्मद माजीद रा. अशोक नगर, मोहम्मदिया मज्जीद, अकोटफैल,अकोला असून माझ्या शाळेच्या शाळा सोडल्याच्या दाखल्यावर जबीन बानो मो. रफिक असे आहे. मात्र मला यापुढे महिजबीन मोहम्मद माजीद या नावाने ओळखावे. करिता मी जाहीरपणे माझ्या नावात बदल करीत आहे. सही
महिजबीन मोहम्मद माजीद

## विकणे आहे

श्रीमती बसंती चांडक रिलीफ फाउंडेशन, रामदासपेठ, अकोलाआम च्याकडे भंगार झालेले, कालबाह्य आणि न वापरता येण्याऱ्या वस्तू विकायला आहे. १. कूलर ७, २. बॅटरी २१, ३. ३. उपकरणे ८३, ४. ४. सायकल २, ५. ५. गॅस शेगडी १, ६. ६. मॉनिटर ३ हे भंगार खरेदी करण्यास इच्छुक असणाऱ्या, विक्रेत्यांनी संपर्क साधावा संपर्क : वसंत शर्मा मो.क्र ८६०५७०४०१७


## भारतीय सशस्त्र सैन्यदलामध्ये

# अधिकारी पदाच्या पूर्व प्रशिक्षणाची मोफत सुवर्णसंधी

**■अकोला,दि ११ (प्रतिनिधी) :**
भारतीय सैन्यदल, नौदल, व वायुदला मध्ये अधिकारी पदावर भरती होण्यासाठी पात्र उमेदवारांना सर्विस सिलेक्शन बोर्ड या परीक्षेची पुर्व तयारी करून घेण्यासाठी छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक येथे महाराष्ट्र शासनातर्फे महाराष्ट्रातील नवयुवक व युवतीसाठी दि. ०३ नोव्हेंबर ते १२ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत एसएसबी कोर्स क्र-६३ आयोजित करण्यात येत आहे. सदर कोर्ससाठी प्रशिक्षणार्थींची निवास, भोजन, आणि प्रशिक्षणाची निःशुल्क सोय करण्यात आली आहे.

अकोला जिल्ह्यातील इच्छुक उमेदवारांनी सैन्य दलातील अधिकारी पदांची संधी उपभोगण्यासाठी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, अकोला येथे दि. २९ ऑक्टो २०२५ रोजी मुलाखतीस हजर राहावे. मुलाखतीस येतेवेळी उमेदवारांनी सैनिक कल्याण विभाग (डीएसडब्लु), पुणे यांची वेबसाईट www.mahasainik.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर सर्च करून त्यामधील एसएसबी - ६३ कोर्सेसाठी किंवा व्हाटसॲप क्र- ९१५६०७३३०६ वर संबंधित प्रवेश पत्र व परिशिष्टांची चेक लिस्ट यांचे अवलोकन करून त्याची दोन प्रतीमध्ये प्रिंट काढून (किंवा प्रिंट कार्यालयाकडून घ्यावी) ते पुर्ण भरून सोबत घेऊन यावे.

केंद्रामध्ये एसएसबी कोर्समध्ये प्रवेश मिळण्यासाठी खाली नमूद कोणतीही एक पात्रता आवश्यक आहे व त्यासंबंधीचे पात्रता प्रमाणपत्र कोर्सला येतांना सोबत घेवून यावेत.कंम्बाईड डिफ फेन्स सर्व्हिसेस एक्झामिनेशन (सीडीएसई -युपीएससी) अथवा नॅशनल डिफफेंस ॲकेडमी एक्झामिनेशन (एनडीए-युपीएससी) पास झालेली असावी व त्यासाठी सर्व्हिसेस सिलेक्शन बोर्ड मुलाखतीसाठी पात्र झालेले असावे. एनसीसी 'सी' सर्टिफिकेट 'ए' किंवा 'बी' ग्रेड मध्ये पास झालेले असावेत व एनसीसी ग्रुप हेडक्कार्टरने एसएसबीसाठी शिफारस केलेली असावी. टेक्नीकल ग्रॅज्युएट कोर्ससाठी एसएसबी मुलाखतीसाठी कॉल लेटर असावे.

युनिर्वसिटी एन्ट्री स्किमसाठी एसएसबी कॉल लेटर असावे किंवा एसएसबीसाठी शिफारस केलेल्या यादीत नाव असावे. अधिक माहितीसाठी प्रभारी अधिकारी, छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक यांच्या ईमेल आईडी- training.{ctcnashik@gmail.com व दुरध्वनी क्र. ०२५३-२४५१०३२ किंवा व्हाटसॲप क्र-९१५६०७३३०६ वर कार्यालयीन वेळेत प्रत्यक्ष अथवा दुरध्वनीवर संपर्क करावा, असे आवाहन जिल्हा निवृत्त सैनिक कल्याण अधिकारी मेजर आनंद शरद पाथरकर यांनी केले आहे.

# प्रभात'बास्केटबॉलचे १७ विद्यार्थी विभागस्तरावर

**■अकोला,दि ११ (प्रतिनिधी) :**
प्रभात किड्स स्कूलच्या १७ बास्केटबॉलपटूंनी जिल्हास्तरीय बास्केटबॉल स्पर्धेत उत्कृष्ट यश संपादीत केल्याने त्यांची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद, जिल्हा क्रीडा संकुल व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय बास्केटबॉल स्पर्धेचे आयोजन न्यू इंग्लिश स्कूल, अकोला येथे दि. २३ ते २४ सप्टेंबर २०२५ दरम्यान करण्यात आले होते.या जिल्हास्तरीय बॉस्केटबॉल स्पर्धेत १४ वर्षाआतील मुलींमधून अनन्या ठाकरे, अनुश्री भोंडे, आनंदी मेटांगे, आनंदी भटकर, अनुष्का खांडे, रिद्धी मानकर, यशदाई राम टेके, आस्था ताथोड, रुहल राठी, मुग्धा



चवरे, अन्वी साठे, महश्री लाखे तर १४ वर्षाआतील मुलांमधून जेनील काटकोरिया, विराज महल्ले तसेच १७ वर्षाआतील मुलांमध्ये रेवतेजसिंग मल्ली त्याचप्रमाणे १७ वर्षाआतील मुलींमध्ये तन्वी मेहरे, अन्वी म ेडक या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट यश प्राप्त करून त्यांची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या सर्व विजयी खेळाडूंना प्रभातचे क्रीडा प्रशिक्षक आशिष बेलोकार, शितल गावंडे व भूषण मदनकार यांचे मार्गदर्शन लाभले.डॉ. गजानन नारे, सौ. वंदना नारे, सचिव निरज आवंडेकर, प्राचार्य वृषाली वाघमारे, अर्चना बेलसरे, समन्वयक मो. आसिफ व क्रीडा विभागप्रमुख स्वप्निल मांदाळे यांच्यासह शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचार्यांनी विजयी खेळाडूंचे कौतुक केले.

# ज्युनिअर राष्ट्रीय कॅरम चॅम्पीयनशिप चाचणीस उत्स्फूर्त प्रतिसाद



**■अकोला,दि ११ (प्रतिनिधी) :**
दिनांक १ नोव्हेबर ते ४ नोव्हेबर २०२५ दरम्यान ग्वालीयर येथे होणाऱ्या ५० व्या ज्युनियर व युथ राष्ट्रीय कँरम चैम्पियनशिप स्पर्धे करीता अखिल भारतीय कॅरम फेडरेशन नवी दिल्ली अंतर्गत विदर्भ कॅरम असो.च्या वतीने स्थानीय एलआरटी महाविद्यालय सभागृहात आयोजित कॅरम चाचणी व सराव स्पर्धेस उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. शनिवार पासून प्रारंभ झालेल्या या चाचणी स्पर्धेचे पारितोषिक कार्यक्रमाच्या रूपाने समापन आज रविवार दि १२ ऑक्टोबर रोजी होणार आहे. १०,१४,१८,२१ वर्षाच्या आतील मुला मुलींसाठी आयोजित या स्पर्धेचा प्रारंभ विदर्भ कॅरम असो चे अध्यक्ष,माजी आ. गिरीश व्यास व जिल्हा क्रीडा अधिकारी डॉ सतीशचंद्र भट्ट यांच्या हस्ते कैरम बोर्डवर व डॉ किशोर मालोकार, एड सुभाष मुंगी, बाज ई सोसायटीचे सदस्य दीपक चांडक, कॅरम असो चे सचिव प्रभजीत सिंह बछेर आदींच्या उपस्थितीत करण्यात आला.या कॅरम चाचणी स्पर्धेत नागपूर, भंडारा, अकोला, वाशिम, यवतमाळ, गोंदिया आदी जिल्ह्यातील स्पर्धकांनी सहभाग घेत आपल्या कलेची चुणूक दाखविली.


MAHAGENCO
Maharashtra State Power Generation Co. Ltd.

## E-Tender Notice

Chandrapur Super Thermal Power Station MAHAGENCO, invites bid offers from reputed and experienced Companies to Participate in the Competitive bidding Process to following O&M Tenders.

| S. N. | Tender NO (Rfx No) / Descricption / Estimated Cost in Rs. |
|---|---|
| 1 | TECHNICAL / Rfx No. 3000062417 / Work contract for deployment of Security at Vulnerable points in Padmapur-Bhatadi Pipe Conveyor system area along with patrolling vehicle in CSTPS, Chandrapur / Rs.16401919.40/- |

Above floated tender published in MAHAGENCO online Portal. For the detailed Tender document, interested bidders should visit SRM Website **https://eprocurement.mahagenco.in for (Sr. No. 01)** For any query Contact No. 8554991818.

Sd/-
**CHIEF ENGINEER (O&M)**
**CSTPS, CHANDRAPUR**


RNINO-46973/1986 **महासागर अकोला** मालक,मुद्रक,प्रकाशक **श्रीकृष्ण तनसुखदास चांडक** यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर१-८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, कमला स्केअर, दुर्गा चौक,अकोला येथे प्रकाशित केले. संपादक **श्रीकृष्ण तनसुखदास चांडक** मुख्य कार्यालय फोन ७४४७७३५८५१,९९२२९७००२३+स्थानिक संपादक **पुरुषोत्तम ढोले** फोन ९८८१४८९४७९+(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.)

# महासागर अकोला

●रविवार,दि.१२ ऑक्टोबर २०२५

पान ६


### आगरकर संशोधन संस्थेत भरती प्रक्रिया

**अकोला :** आगरकर संशोधन संस्था पुणे अंतर्गत प्रकल्प सहायक पदाची रिक्त जागा भरण्यासाठी पात्र असणाऱ्या उमेदवारांकडून अर्ज मागवण्यात येत आहे. अर्ज ऑनलाइन पद्धतीने करायचा आहे. अर्ज करण्याची शेवटची तारीख १५ ऑक्टोबर आहे.

## माना पोलीसांची मोठी कामगिरी–चोरीचा गुन्हा उघड




■मुर्तिजापुर,दि ११ (प्रतिनिधी) :
– माना पोलीसांकडुन बक–या चोरीचा गुन्हा उघड, आरोपी कडुन ०४ लाख ४९ हजार रूपये चापोलीस स्टेशन माना येथे दि ०२.१०.२०२५ रोजी फिर्यादी अनिल रामदास साबळे वय ५५ वर्ष रा. राजनापुर खिनखिनी ता. मुर्तिजापुर जि. अकोला यांचे जबानी रिपोर्ट वरून अप क २४५ / २५ कलम ३०५(अ),३३४(१), बीएनएस अन्वये गुन्हा नोंद असुन सदर गुन्हयातील फिर्यादी याचे गोठयाचा टिन वाकवुन टिणातुन गोठयात प्रवेश करून लहान मोठया चित–या बित–या रंगाच्या ०८ बक–या किंमत अंदाजे ५६,००० रु व एक बोकड काळया रंगाचा वय ०२ वर्ष किंमत अंदाजे ०७,००० रूपये असा एकुण ६३,००० रूपये चा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात इसमाणे चोरून नेल्याबाबत जबानी रिपोर्ट दिला होता.

सदर गुन्हयाचे तपासात गुन्हयाचे घटनास्थळाचे आजूबाजूला तसेच गावापासून बरेच अंतरावर कोठेही सीसीटीव्ही कॅमेरे नव्हते तसेच अज्ञात आरोपीबाबत कोणतीही तांत्रिक माहीती उपलब्ध होत नसल्याने माना पोलीसांनी तपास कौशल्याचा वापर करून त्यांची गोपणीय यंत्रण सक्रिया करून अज्ञात आरोपी बाबत अकोला, वाशिम व अमरावती जिल्हयातून गोपणीय माहिती काढली असता माना पोलीसांना गोपणीय माहिती मिळाली की, ग्राम टाकरखेड शंभु ता भातकुली जि अमरावती येथिल आरोपी नामे अजिम शाह कलीम शाह उर्फ बबलु वय ३५ वर्ष रा टाकरखेड याने सदरचा गुन्हा केला आहे त्यावरून मा. पोलीस अधिक्षक श्री. अर्चित चांडक साहेब यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथक रवाना केले असता तपास पथकाने नमुद आरोपीला ताब्यात घेवुन विचारपुस करून आरोपीचे ताब्यातुन चोरीला गेलेल्या ०९ बक–या पैकी ०७ बक–या किमत ४९,००० रूपये व आरोपीने सदरचा गुन्हा करतांना वापरलेले टाटा एस कंपनीचे वाहन क्रमांक एमएच ३८ ई १०५८ ज्याची किंमत ४,००,००० रूपये असा एकुन ४,४९,००० (०४ लाख ४९ हजार) रूपयाचा मुददेमाल जप्त करून सदरचा गुन्हा उघडकीस आणला आहे.सदर ची कार्यवाही मा. पोलीस अधिक्षक श्री. अर्चीत चांडक साहेब, मा. अप्पर पोलीस अधिक्षक श्री. बदेली चंद्रकांत रेडडी साहेब, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी उपविभाग मुर्तिजापुर सौ. वैशाली मुळे मॅडम, व स्थानिक गुन्हे शाखा अकोला चे पोलीस निरीक्षक श्री. शंकर शेळके यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन माना चे ठाणेदार गणेश नावकार यांच्या नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक पोहेकॉ दिपक सोळंके, पो. शि. आकाश काळे यांनी केली.

## व्यावसायिक शाश्वत शेती तंत्रज्ञानाचा अवलंबच देशाला आत्मनिर्भरतेकडे अग्रेसीत करणारा आहे : आ.अमोल मिटकरी

■अकोला,दि ११ (प्रतिनिधी) :
देशांतर्गत शेती शाश्वत होत शेतकरी संपन्न होण्यासाठी केंद्र आणि राज्य शासनाद्वारे अनेकानेक कालसुसंगत योजनांची अंमलबजावणी होत असून आर्थिक संपन्न शेतकरी हाच संकल्प असल्याचे विश्वास दर्शक प्रतिपादन देशाचे पंतप्रधान मा.नरेंद्र मोदी यांनी केले, आज राष्ट्रीय कृषी विज्ञान परिसर पुसा नवी दिल्ली येथे 'प्रधानमंत्री धन–धान्य कृषि योजना व कडधान्य आत्मनिर्भरता मिशनसह कृषि पायाभूत सुविधा निधीसह विविध प्रकल्पांचे उदघाटन तथा पायाभरणी प्रसंगी प्रत्यक्षरीत्या उपस्थित तथा आभासी माध्यमातून देशभरातील विविध कृषि विषयक संस्थाचे प्रक्षेत्रावर आयोजित विशेष कार्यक्रम प्रसंगी ते बोलत होते. आपल्या अत्यंत प्रभावी आणि वास्तविक संबोधनातून माननीय पंतप्रधानांनी आत्मनिर्भर देश निर्मितीमध्ये ग्रामीण भारताचे विशेषतः शेती क्षेत्राचे योगदान अधोरेखित करत केंद्रशासनाच्या भविष्यातील योजनांचा देखील लेखाजोखा मांडला. याप्रसंगी केंद्रीय कृषिमंत्री मा. ना. शिवराज सिंह चौहान यांनी देखील समायोजित मार्गदर्शन केले.

याच कार्यक्रमाचा भाग म्हणून डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला, कृषी विभाग महाराष्ट्र शासन, प्रकल्प संचालक आत्मा, जिल्हास्तरीय उमेद अभियान व पाणी फाउंडेशन यांचे संयुक्त विद्यमातून रब्बी–उन्हाळी हंगाम नियोजना संदर्भात एक दिवसीय शेतकरी मार्गदर्शन





कार्यक्रमाचे आयोजन कृषी महाविद्यालय, अकोलाच्या स्व. के आर ठाकरे सभागृहात केले होते. विस्तार शिक्षण संचालक डॉ धनराज उंदीरवाडे यांच्या अध्यक्षतेत संपन्न झालेल्या या शेतकरी मार्गदर्शन कार्यक्रमाचे प्रसंगी विद्यापीठ कार्यकारी परिषदेचे सदस्य तथा विधान परिषद सदस्य मा. आ. अमोल मिटकरी यांची विशेष उपस्थिती होती.

याप्रसंगी उपस्थित शेतकरी बंधू भगिनींना उद्घाटनपर मार्गदर्शन करताना आ. मिटकरी यांनी यंदाच्या खरीप हंगामात अनियंत्रित पावसामुळे झालेल्या नुकसानीवर पोटतिडकीने बोलतांना कृषी विद्यापीठाद्वारे संशोधित पिकवाण उत्पादन तंत्रज्ञान आणि यंत्र अवजारांचा काटेकोर वापर काळाची गरज असल्याचे सांगत बीबीएफ, अतिघन लागवड पद्धत, सेंद्रिय नैसर्गिक व गरजेनुसार इतर निविष्ठांच्या एकात्मिक वापरातून व्यावसायिक शाश्वत शेती तंत्रज्ञानाचा अवलंबच देशाला आत्मनिर्भरतेकडे अग्रेसीत करेल असे देखील प्रतिपादन केले व आज देशाचे लोकप्रिय पंतप्रधान माननीय नरेंद्र मोदी साहेबांच्या दूरदृष्टीतून लोकार्पण होत असलेल्या प्रधानमंत्री धन–धान्य कृषी योजना व कडधान्य आत्मनिर्भरता मिशन सोबतच विविध उपक्रमांचा प्रभावी वापर करीत फायदेशीर शेतीची संकल्पना कृतीत आणावी व राज्य तथा केंद्र शासनाच्या माध्यमातून शाश्वत ग्राम विकास साधावा असे आवाहनही याप्रसंगी केले.

### शिवाजी पार्क येथे शिवकालीन गेटची उभारणी करावी!

**अकोला :** अकोला शहरातील शिवाजी कॉलेजजवळील शिवाजी पार्क येथे भव्य शिवकालीन गेटची उभारणी करण्यात यावी तसेच जिजाऊ हॉल अकोला येथे माँ आय जिजाऊंचा पूर्णाकृती पुतळा उभारून जिजाऊ हॉल मनपाकडे वर्ग करण्यात यावा, अशी मागणी वंचितच्या वतीने मनपाआयुक्तांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

## छत्रपती शाहू सार्वजनिक वाचनालयाचे वतीने ग्रंथ प्रदर्शनी

■अकोला,दि ११ (प्रतिनिधी) :
महाराष्ट्र राज्यातील सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालये ,केंद्र व राज्य शासनाच्या अखत्यारीतील सर्व कार्यालये यांना संशोधन संवर्धन व जन जागृती व्हावी या उद्देशाने दरवर्षी दिनांक ३ ऑक्टोबर हा दिवस अभिजात मराठी भाषा दिवस व दिनांक ३ ऑक्टोबर ते नऊ ऑक्टोबर या कालावधीमध्ये अभिजात मराठी भाषा सप्ताह विविध उपक्रमाने साजरा करण्याबाबत शासनाने केलेल्या आदेशानुसार छत्रपती शाहू सार्वजनिक वाचनालय, हनुमान नगर, अकोलाचे वतीने दिनांक ९-१०- २०२५ रोजी ग्रंथ प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले. ग्रंथ प्रदर्शनीचे उद्घाटन संत गाडगेबाबा सार्वजनिक वाचनालयाचे अध्यक्ष तथा अकोला जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष श्री शामराव वाहूरवाघ यांचे हस्ते दीप प्रज्वलन व डॉ. एस. आर .रंगनाथन यांचे प्रतिमेचे पूजन करून व पुष्पहार अर्पण करून करण्यात आले. याप्रसंगी अभिजात मराठी भाषा या विषयावर श्री शामरावजी वाहूरवाघ यांनी मार्गदर्शन करून मराठी भाषेचे व वाचनाचे



महत्त्व विशद केले कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी सौ.शकुंतला शिंदे उपस्थित होत्या.

त्यांनी नेहमीच स्तुत्य उपक्रम राबविणाऱ्या छत्रपती शाहू वाचनालयाचा फायदा परिसरातील नागरिकांनी घ्यावा असे आवाहन याप्रसंगी केले. कार्यक्रमाला ग्रंथपाल सौ. दीपिका मुळे, सौ अंजली देशमुख, मीनाक्षी मुळे ,अरुण वाघ, एड. मेडशीकर श्री हिवसे,विक्रांत मुळे, किशोर प्रांजळे, उद्धवराव ठाकरे, विलास नाकट, अशोक बोंद्रे ,गणेशराव काकड, गजानन कंडारकर, राजाभाऊ शेरेकर, सुनील वानखडे, अभय भेंडे ,ऋषिकेश घुईकर, श्याम काळे ,गणेश वडतकर उपस्थित होते. श्रेयश हिवसे, आशाताई नावकार, तसेच डॉ. शशिकांत पवार, विलास काळे, नागोराव चव्हाण, एड. चेतन यादव, काशिनाथ तिकोडे , मनोहर पाटील ,लक्ष्मण जाधव , राजेश जाधव, आशाताई पवार ,अनिल शिंदे आदि मान्यवरासह हनुमान नगर, वृंदावन नगर, गणेश पेठ ,उमरी परिसरातील नागरिकांनी उस्फूर्त प्रतिसाद देऊन ग्रंथ प्रदर्शनीचा लाभ घेतला. कार्यक्रमाचे संचालन ग्रंथपाल सौ .दीपिका मुळे यांनी तर आभार सौ. अंजलीताई देशमुख यांनी मानले.

## अकोला जिल्हा ग्रामीण भाजपा महिला मोर्चाची जंबो कार्यकारिणी जाहीर

### सबका साथ–सबका विकास–सबका प्रयास या ध्येयाने सशक्त महिलांची एकजूट

■तेल्हारा,दि ११ (प्रतिनिधी) :
भारतीय जनता पार्टी अकोला जिल्हा ग्रामीण महिला मोर्चाच्या जंबो कार्यकारिणीची घोषणा जिल्हा अध्यक्ष जयश्री पुंडकर यांनी केली. ङ्गसबका साथ, सबका विकास, सबका प्रयासङ्ग या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विचारसरणीवर आधारित ही कार्यकारिणी रचना करण्यात आली आहे. पक्ष संघटन अधिक बळकट करण्यासाठी विविध घटकांतील आणि स्तरांवरील महिलांना यात प्राधान्य देण्यात आले आहे.या कार्यकारिणीबाबत भाजपाचे प्रदेश सरचिटणीस आमदार रणधीर सावरकर, खासदार अनुप धोत्रे, पालकमंत्री आकाश फुंडकर, संघटनमंत्री डॉ. उपेंद्र कोठेकर, माजी केंद्रीय







मंत्री संजय धोत्रे, महिला मोर्चा प्रदेश अध्यक्षा आमदार चित्रा वाघ, तसेच जिल्हाध्यक्ष संतोष शिवरकर, माजी जिल्हाध्यक्ष तेजराव थोरात, किशोर मांगटे पाटील यांच्यासह अनेक वरिष्ठ नेत्यांशी सल्लामसलत करण्यात आली.जयश्री पुंडकर यांनी ज्येष्ठ कार्यकर्त्यांचा सल्ला घेऊन आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती व नगर परिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर महिलांचा सहभाग वाढवण्यासाठी ही कार्यकारिणी जाहीर केली. ङ्गप्रत्येक गावात, प्रत्येक नगरपालिकेत भारतीय जनता पक्षाचा झेंडा फडकवायचा आहे, असे त्यांनी सांगितले. नवीन कार्यकारिणीत अनुभवी तसेच तरुण कार्यकर्त्यांचा समावेश आहे.सरचिटणीसपदी मूर्तिजापूरच्या माजी नगराध्यक्ष मोनाली गावंडे आणि अकोटच्या माजी नगरसेविका माया धुळे यांची पुनर्नियुक्ती करण्यात आली.उपाध्यक्ष म्हणून शालिनी हजारे, रेखा गोतरकर, प्रतिभा धमाळे आणि छाया मानकर यांची नियुक्ती झाली.सचिवपदी प्रिया महल्ले, मीना नकासकर, सुनिता बगाडे आणि शितल गावंडे यांची निवड करण्यात आली. कोषाध्यक्ष म्हणून कल्पना पोहणे, प्रसिद्धीप्रमुख म्हणून ज्योती टाले आणि सोशल मीडिया प्रमुख म्हणून गौरी चव्हाण यांच्यावर जबाबदारी सोपविण्यात आली आहे.सदस्यपदी मनीषा विजेकर, दिपाली तिडके, पल्लवी नेमाडे, चुळसा गाडगे, मंजुषा लोथे, रेखा भाकरे, कुसुम जायले, सिंधू गडम, चंदा आमले, पल्लवी कदम, प्रतिभा येऊन, वंदना लोणकर, अनिता देवीकर, अनिता पवार, रूपल गुजराती, ज्योती ठोकळ आणि स्वाती गंभीरे यांचा समावेश आहे.

## इंग्रज हे हिंदू मुस्लिम वादाचे खरे सूत्रधार–अन्वर राजन

■अकोला,दि ११ (प्रतिनिधी) :
हिंदू -मुस्लिम वाद हा आपल्या मनावर अगदी लहानपणापासून बिंबवला गेला आहे. हिंदू-मुस्लिम वैमनस्य सारख्या आंतरिक बाबी डोक्यातून काढणे एक मोठे आज आव्हान ठरत आहे.

हा प्रश्न जाणून बुजून उभा करण्यात आला आहे. तथापि या मूळ वादाचे खरे सूत्रधार हे इंग्रज होते. त्यांनी हा वाद ब्रिटिश आमदानीत निर्माण केला असून तो प्रत्येक भारतीयाच्या मनावर बिंबवण्याचा पद्धतशीर प्रयत्न केला असल्याचे मत पुणे येथील व्याख्याता अन्वर राजन यांनी व्यक्त केले. बाबूजी देशमुख वाचनालयाच्या वतीने स्थानीय प्रमिलाताई ओक सभागृहात सुरू असलेल्या ९ दिवसीय नवरात्र व्याख्यान मालेत शनिवारी अन्वर राजन यांनी हिंदू, मुस्लिम प्रश्न आणि राष्ट्रीय एकात्मता या विषयावर आठवे पुष्प गुंफले.

ते पुढे म्हणाले, ब्रिटिश भारतात आल्यावर त्या काळात हिंदू -मुस्लिमांचा फारसा वाद नव्हता. दोन्ही धर्म गुण्यागोविंदाने या देशात नांदत होते. मात्र इंग्रज हे राज्यकर्ते झाल्यावर हिंदू- मुस्लिमांचे एक्य अबाधित राहिले.


### सार्वजनिक सूचना

आपणास कळविण्यात येते की, सौ. राजश्री प्रमोद बोर्डे या आपल्या मालकीच्या खाली नमूद केलेल्या मालमत्तेवर पिरामल फायनान्स, अकोला यांचेकडून कर्ज मिळविण्यासाठी तारण ठेवण्याचा मनोदय व्यक्त करीत आहेत.

मौजा – टाकळी जलम, ग्रामपंचायत टाकळी जलम हद्दीत, तालुका – अकोला, जिल्हा – अकोला येथे स्थित, आर.सी.सी. बांधकामासह खुला भूभाग, क्षेत्रफळ ३२ फूट बाय २० फूट ६४० चौ.फु., ग्रामपंचायत मिळकत क्र. ९५ असलेली संपूर्ण मालमत्ता.

वरील मालमत्ता ही पूर्णतः सौ. राजश्री प्रमोद बोर्डे यांच्या एकमेव व निर्विवाद मालकीची असून, इतर कोणत्याही व्यक्तीचा त्या मालमत्तेवर कोणताही हक्क, दावा, स्वारस्य, मालकी हक्क किंवा अडथळा नाही.

म्हणून, जर कोणत्याही व्यक्तीस वरील मालमत्तेबाबत कोणताही दावा, हरकत, हक्क, स्वारस्य अथवा कायदेशीर अडथळा असल्यास, त्यांनी आपल्या लेखी हरकतीसह आवश्यक पुरावे या सूचनेच्या प्रकाशनानंतर त्वरित खाली दिलेल्या पत्त्यावर सादर करावेत.

नोंद घ्यावी की, या सूचनेच्या प्रकाशनानंतर प्राप्त होणाऱ्या कोणत्याही हरकती किंवा दावे ग्राह्य धरले जाणार नाहीत आणि तारण प्रक्रिया नियमानुसार पुढे सुरू राहील.

ही जाहीर सूचना वर्तमानपत्रामार्फत प्रसारित करण्यात येत असून, यानंतर प्राप्त होणाऱ्या हरकतींचा विचार करण्यात येणार नाही.

ॲड. रुचा देशमुख
मो. क्र. ७७७४०१२१८४
कार्यालय – कक्ष क्र. २१०, अ विंग, लोकमत बिल्डिंग,रामदासपेठ, नागपूर

### नावात बदल

मी महिजबीन मोहम्मद माजीद रा. अशोक नगर, मोहम्मदिया मज्जीद, अकोटफैल,अकोला असून माझ्या शाळेच्या शाळा सोडल्याच्या दाखल्यावर जबीन बानो मो. रफिक असे आहे. मात्र मला यापुढे महिजबीन मोहम्मद माजीद या नावाने ओळखावे. करिता मी जाहीरपणे माझ्या नावात बदल करीत आहे. सही
महिजबीन मोहम्मद माजीद

### विकणे आहे

श्रीमती बसंती चांडक रिलीफ फाउंडेशन, रामदासपेठ, अकोलाआमच्याकडे भंगार झालेले, कालबाह्य आणि न वापरता येण्याऱ्या वस्तू विकायला आहे. १. कूलर ७, २. बॅटरी २१, ३. ३. उपकरणे ८३, ४. ४. सायकल २, ५. ५. गॅस शेगडी १, ६. ६. मॉनिटर ३ हे भंगार खरेदी करण्यास इच्छुक असणाऱ्या, विक्रेत्यांनी संपर्क साधावा संपर्क : वसंत शर्मा मो.क्र ८६०५७०४०१७


## भारतीय सशस्त्र सैन्यदलामध्ये अधिकारी पदाच्या पूर्व प्रशिक्षणाची मोफत सुवर्णसंधी

■अकोला,दि ११ (प्रतिनिधी) :
भारतीय सैन्यदल, नौदल, व वायुदला मध्ये अधिकारी पदावर भरती होण्यासाठी पात्र उमेदवारांना सर्विस सिलेक्शन बोर्ड या परीक्षेची पुर्व तयारी करून घेण्यासाठी छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक येथे महाराष्ट्र शासनातर्फे महाराष्ट्रातील नवयुवक व युवतीसाठी दि. ०३ नोव्हेंबर ते १२ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत एसएसबी कोर्स क्र-६३ आयोजित करण्यात येत आहे. सदर कोर्ससाठी प्रशिक्षणार्थीची निवास, भोजन, आणि प्रशिक्षणाची निःशुल्क सोय करण्यात आली आहे.

अकोला जिल्ह्यातील इच्छुक उमेदवारांनी सैन्य दलातील अधिकारी पदांची संधी उपभोगण्यासाठी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, अकोला येथे दि. २९ ऑक्टो २०२५ रोजी मुलाखतीस हजर राहावे. मुलाखतीस येतेवेळी उमेदवारांनी सैनिक कल्याण विभाग (डीएसडब्लु), पुणे यांची वेबसाईट www.mahasainik.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर सर्च करून त्यामधील एसएसबी – ६३ कोर्ससाठी किंवा व्हाटसॲप क्र- ९१५६०७३३०६ वर संबंधित प्रवेश पत्र व परिशिष्टांची चेक लिस्ट यांचे अवलोकन करून त्याची दोन प्रतीमध्ये प्रिंट काढून (किंवा प्रिंट कार्यालयाकडून घ्यावी) ते पुर्ण भरून सोबत घेऊन यावे.

केंद्रामध्ये एसएसबी कोर्समध्ये प्रवेश मिळण्यासाठी खाली नमूद कोणतीही एक पात्रता आवश्यक आहे व त्यासंबंधीचे पात्रता प्रमाणपत्र कोर्सला येतांना सोबत घेवून यावेत.कंम्बाईड डिफफेन्स सर्व्हिसेस एक्झामिनेशन (सीडीएसई -युपीएससी) अथवा नॅशनल डिफफेंस ॲकेडमी एक्झामिनेशन (एनडीए–युपीएससी) पास झालेली असावी व त्यासाठी सर्व्हिसेस सिलेक्शन बोर्ड मुलाखतीसाठी पात्र झालेले असावे. एनसीसी 'सी' सर्टिफिकेट 'ए' किंवा 'बी' ग्रेड मध्ये पास झालेले असावेत व एनसीसी ग्रुप हेडक्वार्टरने एसएसबीसाठी शिफारस केलेली असावी. टेक्नीकल ग्रॅज्युएट कोर्ससाठी एसएसबी मुलाखतीसाठी कॉल लेटर असावे.

युनिर्वसिटी एन्ट्री स्किमसाठी एसएसबी कॉल लेटर असावे किंवा एसएसबीसाठी शिफारस केलेल्या यादीत नाव असावे. अधिक माहितीसाठी प्रभारी अधिकारी, छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक यांच्या ईमेल आईडी– training.{ctcnashik@gmail.com व दुरध्वनी क्र. ०२५३–२४५१०३२ किंवा व्हाटसॲप क्र–९१५६०७३३०६ वर कार्यालयीन वेळेत प्रत्यक्ष अथवा दुरध्वनीवर संपर्क करावा, असे आवाहन जिल्हा निवृत्त सैनिक कल्याण अधिकारी मेजर आनंद शरद पाथरकर यांनी केले आहे.

## प्रभात'बास्केटबॉलचे १७ विद्यार्थी विभागस्तरावर

■अकोला,दि ११ (प्रतिनिधी) :
प्रभात किड्स स्कूलच्या १७ बास्केटबॉलपटूंनी जिल्हास्तरीय बास्केटबॉल स्पर्धेत उत्कृष्ट यश संपादीत केल्याने त्यांची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद, जिल्हा क्रीडा संकुल व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय बास्केटबॉल स्पर्धेचे आयोजन न्यू इंग्लिश स्कूल, अकोला येथे दि. २३ ते २४ सप्टेंबर २०२५ दरम्यान करण्यात आले होते.या जिल्हास्तरीय बॉस्केटबॉल स्पर्धेत १४ वर्षाआतील मुलींमधून अनन्या ठाकरे, अनुश्री भोंडे, आनंदी मेटांगे, आनंदी भटकर, अनुष्का खांडे, रिद्धी मानकर, यशदाई रामटेके, आस्था ताथोड, रुहल राठी, मुग्धा



चवरे, अन्वी साठे, महश्री लाखे तर १४ वर्षाआतील मुलांमधून जेनील काटकोरिया, विराज महल्ले तसेच १७ वर्षाआतील मुलांमध्ये रेवतेजसिंग मल्ली त्याचप्रमाणे १७ वर्षाआतील मुलींमध्ये तन्वी मेहरे, अन्वी मेडक या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट यश प्राप्त करून त्यांची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या सर्व विजयी खेळाडूंना प्रभातचे क्रीडा प्रशिक्षक आशिष बेलोकार, शितल गावंडे व भूषण मदनकार यांचे मार्गदर्शन लाभले.डॉ. गजानन नारे, सौ. वंदना नारे, सचिव निरज आवंडेकर, प्राचार्य वृषाली वाघमारे, अर्चना बेलसरे, समन्वयक मो. आसिफ व क्रीडा विभागप्रमुख स्वप्निल मांदाळे यांच्यासह शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचार्यांनी विजयी खेळाडूंचे कौतुक केले.

## ज्युनिअर राष्ट्रीय कॅरम चॅम्पीयनशिप चाचणीस उत्स्फूर्त प्रतिसाद



■अकोला,दि ११ (प्रतिनिधी) :
दिनांक १ नोव्हेबर ते ४ नोव्हेबर २०२५ दरम्यान ग्वालीयर येथे होणाऱ्या ५० व्या ज्युनियर व युथ राष्ट्रीय कॅंरम चैम्पियनशिप स्पर्धे करीता अखिल भारतीय कॅरम फेडरेशन नवी दिल्ली अंतर्गत विदर्भ कॅरम असो.च्या वतीने स्थानीय एलआरटी महाविद्यालय सभागृहात आयोजित कॅरम चाचणी व सराव स्पर्धेस उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. शनिवार पासून प्रारंभ झालेल्या या चाचणी स्पर्धेचे पारितोषिक कार्यक्रमाच्या रूपाने समापन आज रविवार दि १२ ऑक्टोबर रोजी होणार आहे. १०,१४,१८,२१ वर्षाच्या आतील मुला मुलींसाठी आयोजित या स्पर्धेचा प्रारंभ विदर्भ कॅरम असो चे अध्यक्ष,माजी आ. गिरीश व्यास व जिल्हा क्रीडा अधिकारी डॉ सतीशचंद्र भट्ट यांच्या हस्ते कैरम बोर्डवर व डॉ किशोर मालोकार, एड सुभाष मुंगी, बाज ई सोसायटीचे सदस्य दीपक चांडक, कॅरम असो चे सचिव प्रभजीत सिंह बछेर आदींच्या उपस्थितीत करण्यात आला.या कॅरम चाचणी स्पर्धेत नागपूर, भंडारा, अकोला, वाशिम, यवतमाळ, गोंदिया आदी जिल्ह्यातील स्पर्धकांनी सहभाग घेत आपल्या कलेची चुणूक दाखविली.


MAHAGENCO
Maharashtra State Power Generation Co. Ltd.

### E-Tender Notice

Chandrapur Super Thermal Power Station MAHAGENCO, invites bid offers from reputed and experienced Companies to Participate in the Competitive bidding Process to following O&M Tenders.

| S. N. | Tender NO (Rfx No) / Descricption / Estimated Cost in Rs. |
|---|---|
| 1 | TECHNICAL / Rfx No. 3000062417 / Work contract for deployment of Security at Vulnerable points in Padmapur-Bhatadi Pipe Conveyor system area along with patrolling vehicle in CSTPS, Chandrapur / Rs.16401919.40/- |

Above floated tender published in MAHAGENCO online Portal. For the detailed Tender document, interested bidders should visit SRM Website **https://eprocurement.mahagenco.in for (Sr. No. 01)** For any query Contact No. 8554991818.

Sd/-
**CHIEF ENGINEER (O&M)**
**CSTPS, CHANDRAPUR**



RNINO-46973/1986 **महासागर अकोला** मालक,मुद्रक,प्रकाशक **श्रीकृष्ण तनसुखदास चांडक** यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर१–८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, कमला स्केअर, दुर्गा चौक,अकोला येथे प्रकाशित केले.
संपादक **श्रीकृष्ण तनसुखदास चांडक** मुख्य कार्यालय फोन ७४४७७३५८५१,९९२२९७००२३+स्थानिक संपादक **पुरुषोत्तम ढोले** फोन ९८८१४८९४७९+(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.)

